**नियमित दिवाणी दावा नं. ९८/२०१९**

**निशाणी क्रमांक ३३ वरील आदेश**

**सी.एन.आर.क्र. MHKO110009702019**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १ नियम १० अन्वये तसेच क्रम ६ नियम १७ सह कलम १५१ अन्वये दाव्याकामी पक्षकार म्हणून सामिल करून दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** प्रस्तुत अर्जाद्वारे वादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटणीकरिता तसेच निरंतर मनाई ताकीदीकरिता दाखल केलेला असून प्रतिवादी क्र. २२ यांना प्रस्तुत कामाची नोटीस पाठविली असता प्रतिवादी क्र. २२ ही दिनांक २५/१२/२०२० रोजी मयत असलेबाबत समजून आले. त्यामुळे प्रतिवादी क्र. २२ चे वारस अभिलेखावर प्रतिवादी क्र. २२(अ) व २२(ब) म्हणून समाविष्ठ करून घेणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. त्यांना या दाव्यात सामिल केलेस दाव्याचा गुणदोषावर काहीही परिणाम होणार नाही. सबब, वरीलप्रमाणे प्रतिवादी क्र. २२(अ) व २२(ब) म्हणून दाखल करणेबाबत वादी यांनी दुरूस्ती मागितलेली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी तर्फे म्हणणे दाखल करून तिव्र विरोध दर्शविण्यात आलेला आहे. वादी यांच्या अर्जास मुदतीच्या कायद्याची बाधा येते. त्याचबरोबर वादी यांनी विलंब माफीचा अर्ज दिलेला नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे. जर प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याचा झाल्यास वादी यांचेवर जास्तीत जास्त खर्च बसविण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली. पुरेशी संधी देऊन देखील प्रतिवादी क्र. १० यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द म्हणणे नाहीचा आदेश पारित करण्यात आला.

**०४.** प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील प्रतिवादी यांचे म्हणणे व संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ, प्रतिवादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ यांचा

सखोल युक्तीवाद ऐकला.

**०५.** संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द दावा मिळकत वाटप होऊन मिळणेकरिता व निरंतर मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. त्यामध्ये प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १ नियम १० व क्रम ६ नियम १७ अन्वये पक्षकार म्हणून सामिल करून दुरूस्ती मागणीसाठी दाखल केलेला आहे. अद्याप प्रस्तुत दाव्याकामी न्याय्यचौकशी सुरू झालेली नाही. दाव्यामध्ये कोणास पक्षकार करावे ही बाब वादी यांच्या इच्छेवर आहे. प्रस्तावित पक्षकार हे सदरील दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार असल्याने त्यांना दाव्यातील असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करणेसाठी पक्षकार म्हणून सामिल करणे आवश्यक आहे. सदर पक्षकारांना प्रस्तुत दाव्याकामी सामिल केले नाही तर प्रस्तुत दाव्याचा अंतिम निर्णय होणेस अडचणी निर्माण होणार आहेत. त्याचबरोबर प्रास्ताविक दुरूस्ती ही दाव्याच्या अनुषंगाने असून अर्जातील कथनाप्रमाणे त्यांची बाजू सिध्द करण्याची जबाबदारी ही वादी यांची आहे. अशापरिस्थितीमध्ये वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आ दे श

**१.** वादी यांचा निशाणी क्र. ३३ चा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**२.** वादी यांनी उपरोक्त दुरूस्ती सदर आदेशापासून १४ दिवसाचे आतमध्ये करणेची आहे.

**३.** वादी यांनी उपरोक्त दुरूस्ती केल्यानंतर दुरूस्तीप्रत प्रकरणामध्ये दाखल करणेची आहे.

SANDEEP DEVIDAS SONAWANE
Digitally signed by SANDEEP DEVIDAS SONAWANE
Date: 2022.12.23 11:22:58 +0530

**पेठ–वडगांव.** **( एस. डी. सोनवणे )**
**दिनांक २२/१२/२०२२** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ–वडगांव.**